# प्रकरण २
## हस्तपुस्तिका – १

## संस्था, संस्थेची कार्य व कर्तव्ये यांचा तपशील

### शिक्षण विभागाची ओळख

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ६१ (क्यू) नुसार प्राथमिक शिक्षणाची सुविधा मुलांना उपलब्ध करून देणे हे महानगरपालिकेचे बंधनकारक कर्तव्य आहे.

मुबई महानगरपालिकेचा प्राथमिक शिक्षण विभाग हा आशियातील किंबहुना जगातील सर्वात मोठा शहरी विभाग आहे. २३६७९० मुले ८ निरनिराळया माध्यमांतून येथे शिक्षण घेत आहेत. मुंबई हे बहुभाषिक शहर असल्यमुळे देशाच्या वेगवेगळया भागातून लोक येथे उपजिविकेसाठी येतात. त्यामुळे शिक्षणखात्याने निरनिराळया ८ माध्यामांतून शिक्षण देण्याची सोय केली आहे. भारतीय संविधानाच्या ४५ व्या कलमानुसार मुंबई महानगरपालिका महानगरपालिका शाळेत शिकणा-या मुलांना मोफत आणि दर्जेदार प्राथमिक शिक्षण देत आहे. ही मुले प्रामुख्याने झोपडपट्टीत राहणारी व दारिद्रयरेषेखालील कुटुंबातील आहेत. महानगरपालिका अशा प्रकारच्या शैक्षणिक सुविधा देऊन झोपडपट्टीत राहणाब्या विद्यार्थ्यांची काळजी घेऊन त्यांचा जीवनमानाचा दर्जा उंचावून देशसेवाच करीत आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात प्राथमिक शिक्षणक्षेत्रामध्ये वेगाने झाली आहे. याचे श्रेय संविधान कर्ते आणि शैक्षणिक क्षेत्रातील योजनाकर्ते यांना जाते. स्वातंत्र्यापासून म.न.पा. च्या शिक्षणखात्याची आणि संख्यात्मक प्रगती झाली आहे. शाळांची संख्या ४०० वरून ११३८ (प्राथमिक व माध्यमिक) पर्यंत गेली आहे. महानगरपालिका आपला गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी सतत प्रयत्नशिल असते. मधल्या वेळेचे भोजन, समग्र शिक्षा अभियान यासारखे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवीत असते.

## शिक्षणखाते एका दृष्टीक्षेपात

१.महानगरपालिकेतर्फे दिल्या  जाणा-या शैक्षणिक सुविधा - संख्यात्मक दृष्टीकोन

**अ) म.न.पा. प्राथमिक शिक्षण -**

३०.०९.२०१९ रोजी म.न.पा. च्या प्राथमिक शाळांची विस्तृत माहिती खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १. प्राथमिक शाळांची संख्या - | ९७० |
| २. १ ली ते ५ वी पर्यंतचे विद्यार्थी - | १४५७५३ |
| ३.  ६ वी ते ८ वी पर्यंतचे विद्यार्थी - | ८५९३० |
| ४. प्राथमिक शाळांतील शिक्षकांची संख्या - | ९०९६ |
| ५. स्पेशल शिक्षकांची संख्या - | ७८० |
| ६. चतुर्थश्रेणी कर्मचारी - | १६३३ |
| ७. माध्यमांची संख्या - | ८ |

**ब) म.न.पा. अनुदानित शाळा(प्राथमिक)-**

| | |
|---|---|
| १. खाजगी मान्यताप्राप्त अनुदानित शाळा (पहिली ते चौथी )- | ४०५ |
| २. विद्यार्थी संख्या - | १११९८६ |
| ३. शिक्षकांची संख्या - | २९८८ |
| ४. विनाअनुदानित शांळाची संख्या  - | ७१० |
| ५. विनाअनुदानित शांळातील विद्यार्थ्यांची संख्या – | ३००१४३ |
| ६. विनाअनुदानित शांळातील शिक्षकांची संख्या - | ७३६९ |
| ७. माध्यमांची संख्या - | ८ |

**क) माध्यमिक शिक्षक पाचवी ते दहावी**

| | |
|---|---|
| १. म.न.पा च्या माध्यमिक अनुदानित शाळांची संख्या – | ४८ |
| २. माध्यमिक विनाअनुदानित शाळांची संख्या- | १२० |
| ३. म.न.पा. एम.पी.एस (इ.१ ली ते १०) | ७० |

४. विद्यार्थी संख्या - ३४७०६

५. शिक्षक - १३२४

**ड) शिक्षक प्रशिक्षण**

१. प्राथमिक शिक्षक अध्यापक विद्यालय -०२

अ) **शिक्षक अध्यापक महाविद्यालय - इमामवडा**

तुकडयांची संख्या- ०४ विद्यार्थी संख्या – ११२

**ब) शिक्षक अध्यापक महाविद्यालय -** माहीम (**स्त्रीयांसाठी /** पुरुषांसाठी)

तुकडयांची संख्या- ०२ विद्यार्थी संख्या - ५०

**२. कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या – ०३**

**प्रशासनाचे सद्य व्यवस्थापन**

सद्य स्थितीत शिक्षणाधिकारी आपल्या खात्यासमवेत प्रत्यक्षरीत्या महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त आणि महानगरपालिका सहआयुक्त (शिक्षण) यांच्या अधिपत्याखाली काम करीत आहेत. महानगरपालिका आयुक्त हे शिक्षण खाते आणि म.न.पा च्या योजनांची अंमलबजावणी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणखात्याचे प्रमुख असलेल्या शिक्षण अधिका-**यां**मार्फत करतात. शिक्षणाधिकारी त्यांच्या शैक्षणिक कार्यात अधीक्षक, कनिष्ठ पर्यवेक्षक शारिरीक शिक्षण , निरिक्षक आणि प्रशासकीय कार्यात प्रशासकीय अधिकारी (शाळा), प्रशासकीय अधिकारी (कार्यालय), अनेक मुख्य लिपिक, लिपिक आणि इतर कर्मचारी यांची मदत घेत असतात.

## प्राथमिक शिक्षणाची सद्य स्थिती

बृहन्मुंबई महानगरपालिका ही भारतातील किंबहूना आशियातील सर्वात मोठी प्राथमिक शिक्षण संस्था आहे. ११३८ म.न.पा. शाळांमध्ये २३६७९० विद्यार्थी आणि ४०५ अनुदानित शाळांमध्ये १११९८६ विद्यार्थी आहेत.

| बृहन्मुंबई महानगरपालिका - शिक्षण विभाग | | | |
|---|---|---|---|
| सर्व शिक्षा अभियान यु-डायस २०१९-२० सांख्यिकी माहिती (३०.०९.२०१९) | | | |
| माध्यम | शाळा | विद्यार्थी | शिक्षक |
| मराठी | २८३ | ३५१८१ | १७२१ |
| हिंदी | २२७ | ६३२०२ | २५२५ |
| उर्दू | १९३ | ६२५१६ | २२४४ |
| गुजराथी | ४८ | १८३८ | १३९ |
| तामिळ | ३२ | ३२७६ | १७२ |
| तेलुगु | १७ | ६१२ | ४१ |
| कन्नड | २९ | ११७६ | ८४ |
| इंग्रजी | ५४ | ३३७३७ | १०३२ |
| आव्हानात्मक शाळा | १७ | ८२१ | ८२ |
| मुंबई प. स्कूल (इ. १ ली ते इ.१० वी) | ७० | ३४४३१ | १०५६ |
| एकूण प्राथमिक (अ) | ९७० | २३६७९० | ९०९६ |
| जुन्या अनुदानित माध्यमिक शाळा | ४८ | १६३९२ | ७४४ |
| नवीन विनाअनुदानित माध्यमिक शाळा | १२० | १८३१४ | ५८० |
| एकूण माध्यमिक (ब) | १६८ | ३४७०६ | १३२४ |
| एकूण प्राथमिक व माध्यमिक (अ+ब) | ११३८ | २७१४९६ | १०४२० |

**(क) खाजगी प्राथमिक शाळा**

| माध्यम | शाळा | विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|
| खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा | ४०५ | १११९८६ | २९८८ |

**(ड) विनाअनुदानित शाळा**

| माध्यम | शाळा | विद्यार्थी | शिक्षक |
|---|---|---|---|
| खाजगी प्राथमिक विनाअनुदानित शाळा | ७१० | ३००१४३ | ७३६९ |

## माध्यमिक शाळा

महानगरपालिका माध्यमिक शाळांचे नियंत्रण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात येते. शिक्षण विभागातील माध्यमिक शाळांचे कामकाजाबाबतचे प्रशासकीय व्यवस्थापन उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रभावीपणे पाहत आहेत. सद्यस्थितीत महापालिका शाळांच्या कामकाजांचे केंद्रीकरण झाल्याने शाळांचे कामकाज उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या अधिपत्याखाली पार पाडले जात आहे.

## सर्व शिक्षा अभियान -

सर्व शिक्षा अभियान ही केंद्र व राज्य पुरस्कृत योजना आहे. या योजनेचे प्रमुख उद्दीष्ट ६ ते १४ वयोगटातील बालकांना दर्जेदार शिक्षण देऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास करणे हा आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मनपा शिक्षण विभागात सर्व शिक्षा अभियानात प्रकल्प सन २००६-०७ सालापासून राबविण्यात येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात हा प्रकल्प राबविण्यासाठी एक समिती गठित करण्यात आली असून त्या समितीला जिल्हा कार्यवाही समिती असे संबोधण्यात येते. यात अतिरिक्त आयुक्त (मनपा) हे जिल्हा कार्यकारी समितीचे अध्यक्ष असतात. या समितीला शिक्षण समिती अध्यक्ष , महिला व बालकल्याण अध्यक्ष, सार्वजनिक आरोग्य समिती अध्यक्ष, उपायुक्त (शिक्षण) ,शिक्षणाधिकारी / प्रकल्प अधिकारी (सशिअ) उपलेखाधिकारी (शि.नि.) आणि शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी व बिनसरकारी संस्थामधील सदस्यांचे प्रतिनिधी असतात.

सर्व शिक्षा अभियान या प्रकल्पात जे बालकांना गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यासाठी निधी व उपक्रम अंमलबजावणीसाठी मार्गदर्शन सूचना या महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांचेकडून देण्यात येते. व त्यानुसार विविध उपक्रमांची अंमलबजावणी केली जाते.

सर्व शिक्षा अभियान या प्रकल्पात जे उपक्रमांद्वारे अंमलबजावणी करण्यात येत असलेले प्रकल्प:-

१) मोफत पाठ्यपुस्तक योजना:- मनपा शाळा इ.१ली ते इ.८ वी खाजगी अनुदानित शाळा, इ.१ ली ते इ.४ थी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाते.

२) समावेशित शिक्षण:- विशेष गरजाधारक मुलांना (CWSN) नियमित शाळेत प्रवेश देऊन शिक्षणाची संधी उपलब्ध करणे , योग्य वैद्यकिय व सहाय्यभूत सेवा सुविधा उपलब्ध करणे, विशेष शिक्षकांमार्फत गरजेनुसार शिक्षण देणे.

३) संगणक प्रयोगशाळा: – नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत शाळा डिजीटल करण्यासाठी साहित्य मप्राशिप स्तरावर देण्यात येते.

४) RTE नुसार २५ % शाळाप्रवेश: – खाजगी अनुदानित / विनाअनुदानित शाळांमध्ये आर्थिक व दुर्बल घटकांसाठी शाळेच्या निश्चित केलेल्या प्रवेश वर्गामध्ये २५ % विद्यार्थ्यांना व सोयीसुविधा देण्यासाठी शासनाची योजना आहे.

५) शाळाबाह्य मुलांचा शोध घेणे व त्यांना शालेय प्रवेश देणे:- या मुलांसाठी उपचारात्मक वर्ग योजना

६) जनजागृती उपक्रम:- सर्व शिक्षा अभियान व शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांसंदर्भात सर्व जनतेस माहिती मिळावी यासाठी जनजागृती उपक्रम राबविण्यात येतो.

७) शाळा देखभाल दुरूस्ती अनुदान, शाळा अनुदान, शिक्षक अनुदान शाळांच्या खात्यात दिला जातो.व मप्राशिप च्या निकषांनुसार खर्च केला जातो.

८) प्रशिक्षण:- दरवर्षी नविन अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण राज्यस्तर व जिल्हास्तरावरून सर्व शाळांना देण्यात येते. वेळोवेळी शासनाकडून निर्गमित केलेली प्रशिक्षणे शिक्षकांना देण्यात येतात, गुणवत्ता वाढीसाठीचे प्रशिक्षण देण्यात येते.

## खाजगी अनुदानित प्राथमिक शाळाचा आराखडा

सुधारीत बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ६१ (क्यू) नुसार प्राथमिक शिक्षण उपलब्ध करुन देणे हे महापालिकेचे आवश्यक कर्तव्य आहे. हे उद्दीष्ट नजरेसमोर ठेवून बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग अंतर्गत निरनिराळया एकूण ०८ भाषांमध्ये प्राथमिक शिक्षण देत आहे. या शिवाय महानगरपालिकेची आर्थिक स्थिती व इतर गोष्टी विचारात घेऊन आणि समाजाच्या तळागाळापर्यंत प्राथमिक शिक्षण पोहोचविण्याचे उद्दीष्ट लक्षात घेऊन, महापालिकेने खासगी संस्थाना प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण देण्यासाठी परवानगी देऊन प्रोत्साहित केलेले आहे.

या खासगी खासगी संस्थावर नियंत्रण ठेवण्यासाठी खाजगी प्राथमिक अनुदानित शाळा या विभागामार्फत महापालिकेची स्वतंत्र अनुदान सहाय्य संहिता तयार करण्यात आलेली आहे. या अनुदान संहितेतील अटी व शर्ती व नियमांची पूर्तता करीत असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ५० % वेतन अनुदान देऊन मदत केली जाते.

ज्या खासगी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या शाळांना शिक्षण विभागातील अधिका-यांर्फत पर्यवेक्षण केले जाते व त्याची व्यवस्था उपशिक्षणाधिकारी (अनुदानित प्राथमिक शाळा) यांच्यामार्फत चालविली जाते.

**ईओजी उपविभाग कार्यप्रणाली**

१) सेवानिवृत्त कर्मचा-यांना निवृत्तीवेतनादी लाभ मिळण्याबाबतच्या प्राप्त तक्रार अर्जावर कार्यवाही करणे,

२) शिक्षक कर्मचा-यांचे दिर्घ कालावधीतील रजा मंजूरी, राजीनामा, ५५ वर्ष सेवासातत्य इ. बाबतचे प्रस्ताव,

३) शिक्षक कर्मचा-यांच्या पाल्यांना अनुकंपा /वारसाहक्क मनपा सेवेत नोकरी मिळणेबाबतचे प्रस्ताव,

४) बी.एड. शिक्षकांची यादी अद्यावत करणे, प्रलंबित पेन्शन आढ़ावा / मासिक पेन्शन अदालतीचे आयोजन करणे

५) प्रलंबित निवृत्तीवेतन दावे निकाली काढ़ण्याबाबत पाठपुरावा करणे,

६) सन १९९५-९६ ते सन २०११-१२ मधील लेखापरिच्छेदांबाबतचे मसुदापत्र स्थायी समितीस सादर करणे (एकूण १७ ठराव),

७) ऑडिट पॅरा व मुख्य लेखापरिक्षकांच्या प्रलंबित लेखाटिप्पण्यां व लेखापरिच्छेदाबाबत मासिक आढ़ावा बैठक,

८) महालेखाकार, स्थानिक निधी लेखापरिक्षण, मनपा मुख्य लेखा परीक्षक यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या लेखापरिच्छेद, लेखटिपण्णी,
लेखाआक्षेपाबाबत कार्यवाही करणे

**इओटी उपविभाग**

सभागृह टेबल खुर्ची, कार्यालय टेबल खुर्ची, अग्निशमन यंत्रे, जलशुध्दीकरण यंत्रे, डेस्क बेंचेस, बेस्ट बस मोफत प्रवास, फर्निचर आणि फिक्चर्स, लाकडीलोखंडी फर्निचर विल्हेवाट-

**मध्यवर्ती खरेदी खाते**

प्रशासकीय अधिकारी ( शाळा ) मखखा, हे उपप्रमुख अभियंता मखखा विभाग भायखळा , विद्युत व अभियांत्रिकी विभाग , वरळी माहिती तंत्रज्ञान विभाग, मनपा मुख्य कार्यालय, मनपा मुद्रणालय भायखळा व इतर विभागांशी समन्वय साधून मनपा शालेय विद्यार्थ्यांना निरनिराळ्या शालोपयोगी वस्तू पुरविण्याचे कार्य करतात.

संगणकीय प्रपत्रामध्ये उपलब्ध असलेली माहिती: उपप्रमुख अभियंता मखखा विभाग भायखळा , विद्युत व अभियांत्रिकी विभाग , वरळी माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्या समंन्वयाने

विविध शालेय वस्तूँसाठी मागविल्या जाणा-या निविदा महानगर पालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध असतात.

**अभिलेख विभाग**

अभिलेख कार्यालयात कर्मचा-यांचे निवृत्ती वेतन दावे सेवापुस्तिका, हजेरी पट , वेतन पत्रके,परिपत्रके तसेच इतर कागदपत्रे जतन केली जातात.

| अभिलेख वर्ग | वर्गीकरण कालावधी |
|---|---|
| ए | कायम |
| बी | ३० वर्षे |
| बी २ | १५ वर्षे |
| सी २ | १० वर्षे |
| सी | ०५ वर्षे |
| डी | ०१ वर्ष |

**भांडार विभाग**

भांडार विभाग हे उपप्रमुख अभियंता मखखा विभाग भायखळा , मनपा मुद्रणालय भायखळा विभागांशी समन्वय साधुन शिक्षण खात्याच्या उपविभागीय कार्यालयांना लेखन साहित्य व शाळांना लागणारे छापिल साहित्य पुरविण्याचे कार्य करते.

द्विभाषिक, सेमी इंग्रजी शाळा

शिक्षण खात्यामार्फत विद्यार्थी पट टिकून रहावा तसेच मातृभाषेचा अभिमान बाळगून मातृभाषेच्या शिक्षणासोबतच विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे सखोल ज्ञान मिळावे, याकरिता आजपर्यंत एकूण ८८७ शाळा या द्विभाषिक, सेमी इंग्रजी शाळा सुरु करण्यात आल्या आहेत.